**जाहिर प्रकटन**

**पुणे महानगरपालिका**

**समाज विकास विभाग**

**सन २०२४–२०२५**

**दिव्यांग नागरिक, केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक मोफत बसपास योजना, दृष्टीहीनांसोबत मदतनीसाला पी.एम.पी.एम.एल. तिकिटात ५०% सवलत देणेची योजना**

पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना, केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक यांना पी.एम.पी.एम.एल. मोफत बस पास स्वरूपात देण्याची तसेच दृष्टीहीनांसोबत मदतनीसाला पी.एम.पी.एम.एल. तिकिटात ५०% सवलत देणेची योजना सुरू आहे. सन २०२४–२०२५ या आर्थिक वर्षाकरीता पुणे महानगरपालिका हद्दीमधील लोकोमोटर डिसॅबिलिटी (अस्थिव्यंग), कुष्ठरोग निवारीत/मुक्त, सेरेब्रल पाल्सी (मेंदुचा पक्षाघात), शारीरिक वाढ खुंटणे, स्नायूंची विकृती, आम्ल हल्ला पिडीत, पूर्णतः अंध, अंशतः अंध, कर्णबधिर, वाचा/भाषा दोष, बौद्धिक अक्षम, विशिष्ट अध्ययन अक्षम, स्वमग्न, मानसिक वर्तन/मानसिक आजार, हातापायांतील स्नायू कमजोर/शिथिल होणे, (पार्कीसन्स) कंपवात, अधिक रक्तस्त्राव, रक्ताची कमतरता, रक्ताचे हिमोग्लोबिनचे प्रमाण, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, बहुविकलांग नागरिकांकडून, केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक व दृष्टीहीनांसोबत मदतनीस यांचेकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज ऑनलाईन भरणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या dbt.pmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरती सुविधा उपलब्ध करणेत आलेली आहे. **(यापुर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरलेल्या दिव्यांग नागरिकांनी दुबार ऑनलाईन अर्ज भरू नयेत.)**

**नवीन पास काढणेसाठी नियम व अटी**

१. पुणे महानगरपालिका हद्दीमधील ३ वर्षे वास्तव्य असलेले दिव्यांग नागरिक, केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक, दृष्टीहीनांसोबतचे मदतनीस यांनीच अर्ज करावेत.

२. केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळाल्याचे प्रमाणपत्र व स्वातंत्र सैनिक असल्यास अपलोड करणे आवश्यक आहे.

३. अपत्य पडताळणीसाठी रेशनिंग कार्डची साक्षांकित प्रत आवश्यक. तसेच कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे.

४. दिनांक १/५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.

५. मे. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारी नुसार ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचा दाखला तसेच शासन वेळोवेळी जे बदल सुचवतील त्या प्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल.

६. आधार कार्ड झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

**७. दि.२४ जून २०२४ ते दि.२९ सप्टेंबर २०२४ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ०५.३० पर्यत ऑनलाईन अर्ज विनामूल्य भरण्याची सुविधा त्या त्या कार्यक्षेत्रातील क्षेत्रिय कार्यालयामध्ये करणेत आली आहे.**

८. ऑनलाईन पद्धतीने आलेल्या अर्जांची तपासणी करून पात्र लाभार्थ्यांचे पासेस पी.एम.पी.एम.एल.कडून तयार करून झाल्यानंतर त्यांचे मार्फत शंकरशेठ रोड, पीएमपीएमएल मुख्य इमारती मागे, सेंट्रल कंट्रोल सेंटर, तळमजला, स्वारगेट, पुणे ३७ येथे वाटप करणेत येईल.

९. लाभार्थ्यांने वरिल प्रमाणे नमुद केलेल्या योजने करिता व नियम व अटी प्रमाणे ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे व कागदपत्रे मूळ प्रती स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

➢ **<u>पास नुतनीकरणासाठी</u> – वरील योजना अंतर्गत सन २०२२–२०२३ या आर्थिक वर्षात मी कार्ड मिळालेल्या नागरिकांनी पास नुतनीकरण करणे करीता पासपोर्ट साईज २ फोटो, ओरीजनल पास, आधारकार्ड झेरॉक्स प्रत, दिव्यांगत्व दाखला घेऊन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी शंकरशेठ रोड, पीएमपीएमएल मुख्य इमारती मागे, सेंट्रल कंट्रोल सेंटर, तळमजला, स्वारगेट, पुणे ३७ येथे संपर्क साधावा.**

**दिव्यांग नोंदणी अनिवार्य आहे. पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयामध्ये शारिरीक व मानसिकदृष्टया विकलांग, अंध, अपंग, मतीमंद, मुकबधीर नागरीकांच्या नोंदी करणेकरीता रजिस्टर ठेवण्यात आले आहे. या रजिस्टर मध्ये अद्यापही ज्यांनी नोंद केली नाही अशा दिव्यांग नागरीकांनी त्यांचे निवास्थाना जवळच्या क्षेत्रिय कार्यालयामध्ये नोंदणी करावी.**

**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

D:\New UCD 3\Bus Pass\jahirat apang parkatan 2024.doc